महाराष्ट्र शासन
रोजगार हमी योजना शाखा,
विभागीय आयुक्त कार्यालय, विधान भवन, पुणे-०१.
दूरध्वनी क्र.०२०/२६३६१०५९.
ई-मेल- egsdc.pune-mh@gov.in

**लिलाव नोटीस**

विभागीय आयुक्त कार्यालयातील रोजगार हमी योजना शाखेतील जुनी रद्दी लिलाव पध्दतीने विक्री करावयाची आहे. सदर लिलावाबाबत सविस्तर अटी व शर्ती तसेच संपूर्ण माहिती या कार्यालयाच्या https://divcompune.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २०/०५/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लिलाव प्रक्रियेचा दिनांक | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | निविदा प्रसिध्दीचा दिनांक | २०/०५/२०२५ | सकाळी १०.०० पासून |
| २. | निविदा कागदपत्रे सादर करणेचा दिनांक | २०/०५/२०२५ | सकाळी १०.०० पासून |
| ३. | निविदा कागदपत्रे सादर करणे | २७/०५/२०२५ | सायंकाळी ०५.३० पर्यंत |
| ४. | प्राप्त निविदा कागदपत्रे / मंजूरी देण्याची प्रक्रिया सुरु करण्याचा दिनांक | २८/०५/२०२५ | सायंकाळी ०५.३० पर्यंत |
| ५. | प्राप्त निविदा कागदपत्रे/मंजूरी देण्याचा शेवटचा दिनांक | २८/०५/२०२५ | सायंकाळी ०५.३० पर्यंत |
| ६. | लिलाव सुरु व बंद करण्याचा दिनांक | २८/०५/२०२५ | सकाळी १०.०० ते दुपारी ०१.३० पर्यंत |

कोणतीही लिलाव बोली अथवा सर्व लिलाव बोली कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा तसेच लिलाव याची कार्यवाही कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचा अधिकार सह आयुक्त (रोहयो) यांनी राखून ठेवला आहे. ज्या संस्थांना लिलावाबाबत या कार्यालयाच्या सर्व अटी व शर्ती मान्य असतील अशाच संस्थांनी लिलावामध्ये भाग घ्यावयाचा आहे.

( संजीव पलांडे )
सह आयुक्त (रोहयो)
पुणे विभाग, पुणे.

त (रो.ह.यो.)
कृषि अधि
ार्यकारी
री

## लिलाव अटी व शर्ती

१. **रद्दी** उचलण्याची लिलाव प्रक्रिया ऑनलाईन /ऑफलाईन करणेत येईल, या लिलावा संबंधित सर्व माहिती ऑनलाईन प्रसिध्द करण्यात येईल.

२. सदर **रद्दी** विभागीय आयुक्त कार्यालय पुणे, रोहयो शाखा येथे ठेवण्यात आलेली आहे. दि.२०/०५/२०२५ ते २४/०५/२०२५ पर्यंत दररोज सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत त्याची प्रत्यक्ष पाहणी करुन प्रति कि.ग्रॅ. चे जास्तीत जास्त दर नमूद करावेत, नंतर कोणतीही तक्रार आणि सबब स्विकारली जाणार नाही.

३. लिलाव प्रक्रियेत भाग घेणारी संस्था पुणे महानगर पालिका परिक्षेत्रातील असणे आवश्यक आहे.

४. खालील कागदपत्रे या कार्यालयात दिनांक २०/०५/२०२५ ते २७/०५/२०२५ पर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) जमा करावीत.
   १. पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र
   २. ASSESSMENT YEAR २०२३-२४ किंवा २०२४-२५ साठी आयकर विवरणपत्र
   ३. वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र
   ४. दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र (केवळ MMRDA परिक्षेत्रातील)
   ५. लिलाव अटी व शर्तीच्या प्रतीवर साक्षांकित करण्यात यावे.(सही व शिक्क्यानिशी)

५. ज्या संस्थेस लिलावाचा ठेका देण्यात येईल, त्या संस्थेने विक्री करण्यात येणारे **रद्दी** पेपरचा कुठल्याही प्रकारे गैरवापर करण्यात येणार नसल्याचे हमीपत्र दयावे.

६. **रद्दी** प्रत्यक्ष ताब्यात घेणेपूर्वी कंत्राटदाराने रद्दी वजन करणे आवश्यक आहे.

७. ज्या संस्थेची लिलाव बोली प्रति कि.ग्रॅ. चे दर इतर संस्थांपेक्षा सर्वात जास्त असेल अशाच संस्थेस **रद्दी**ची विक्री करण्यात येईल. नियुक्त संस्थेने वजन केलेली **रद्दी** उचलण्यापूर्वी **रद्दी**ची संपूर्ण रक्कम धनादेशाने कार्यालयाचे नावे जमा करणे अनिवार्य असेल.

८. जुने **रद्दी** जेथे आहे त्यास्थितीत अटी व शर्तीच्या अधीन राहून फाडल्यानंतरच उचलावी लागेल. सदर जुन्या **रद्दी** मध्ये नस्तीसाठी वापरण्यात येणारे पुठ्ठे व झाडलोटीच्या कच-यातील कागदांचा समावेश असल्यामुळे सदर रद्यी आहे त्या अवस्थेत फाडून उचलावी लागेल.

९. तसेच **रद्दी** उचलनाता सुतळी, गोणी व तत्सम सर्व प्रकारचे साहित्य, मजुरांची व्यवस्था तसेच **रद्दी**च्या वाहतूकीचा सर्व प्रकारचा व संपूर्ण खर्च ठेकेदारास स्वखर्चाने करावा लागेल.

१०. ठेका मंजूर केलेल्या संस्थेने **रद्दी** उचलण्याचे काम कार्यालयीन वेळेत म्हणजे सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत साप्ताहिक/सार्वजनिक **सुट्टया** वगळून कामकाजाच्या दिवशी करावयाचे आहे.

११. विक्री करण्यात आलेली **रद्दी** पेपरचे shredding मशीन द्वारे तुकडे करुन, सदर **रद्दी**चे मिलमध्ये लगदा केल्याचे प्रमाणपत्र जमा करावे लागेल.

१२. **रद्दी** पेपर नेताना कार्यालयाच्या इमारतीचे /आवारातील कोणत्याही साहित्याचे कसलेही नुकसान झाल्यास त्याची भरपाई ठेकेदारांकडून त्याच ठिकाणी (on the spot) रोखीच्या स्वरुपात वसूल करण्यात येईल व याबाबत ठेकेदारास बाजू मांडण्याची कोणतीही संधी दिली जाणार नाही.

१३. कोणतेही दर मंजूर वा **रद्द** करणे तसेच **रद्दी** विक्रीची कार्यवाही कोणत्याही स्तरावर थांबविणे हे कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील तसेच याबाबत कोणतीही कारणमिमांसा केली जाणार नाही.

विभागीय आयुक्त कार्यालयातील रोजगार हमी योजना शाखेची जुनी **रद्दी** उचलण्याबाबत ठेक्याच्या लिलावात नमूद केलेल्या वरील सर्व अटी/शर्ती मला संपूर्णपणे तसेच बिनशर्तपणे मान्य आहेत. तसेच सदर अटी आणि शर्तीबाबत माझी कोणतीही तक्रार किंवा हरकत असणार नाही

**नाव-** ______________________ **स्वाक्षरी व संस्थेचा रबरी शिक्का** ______________